86 (10)

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : २६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल :collectormsd@gmail.com

---

क्र.: सी/कार्या-२ आय/टे-८/कावि-कां.स.कां.त./१८
दिनांक : २१/०२/२०१९ 2662

प्रति,
सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा
उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक - 5253
दिनांक - 1/3/19
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

**विषय :** <u>कांदळवन ऱ्हासाबाबत...
मौजे चारकोप ता. बोरीवली येथील स.नं. ४१पै. येथील चारकोप से.२, कांदिवली (प) या ठिकाणी कांदळवन क्षेत्रामध्ये कचरा टाकला असल्याबाबत...</u>

**संदर्भ :** १.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील पत्र क्र. कक्ष-1/ल.ले./ 144/ सन 2018-19 दि. 26/11/2018
२. या कार्यालयाकडील समक्रमांकाचे पत्र दिनांक २८/१२/२०१८
३. उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल क्र. उविअ/का-५/कां.त.प.अहवाल/२०१९ दि. १५/०१/२०१९

प्रस्तुत विषयांकित प्रकरणाबाबत संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये श्री. शैलेन जोशी व इतर ९ यांचेकडील तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला असून मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रूपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर तक्रारीबाबत चौकशी केली असून त्याबाबतचा विहीत नमुन्यातील अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| ०१ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्री. शैलेन जोशी व इतर ९ |
| ०२ | तक्रारीचा विषय | मौजे चारकोप ता. बोरीवली येथील स.नं. ४१पै. येथील चारकोप से.२, कांदिवली (प) या ठिकाणी कांदळवन क्षेत्रामध्ये कचरा टाकला असल्याबाबत |
| ०३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशील उदा: स.नं. , गावाचे नाव, तालुका. | मौजे चारकोप ता. बोरीवली येथील स.नं. ४१पै. |
| ०४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | श्री. विक्रांत कांरडे, मंडळ अधिकारी बोरीवली. |
| ०५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | प्रस्तुत प्रकरणी मौजे चारकोप ता. बोरीवली येथील स.नं. ४१पै. येथील चारकोप से.२, कांदिवली (प) या |

| | | |
|---|---|---|
| | | ठिकाणी लक्ष्मीनगर येथे जाणारा रस्ता असून सदर रस्त्यास लागून कांदळवन क्षेत्र आहे. सदर कांदळवनास लागून कचरा टाकण्यात आल्याचे दिसून येत आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांनी त्यांचेकडील दिनांक १५/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे. |
| ०६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही | कांदळवनापासून ५०मीटरचे आत कचरा टाकल्याचे दिसून आले. |
| ०७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबधित पोलिस ठाण्याचे नाव | चारकोप पोलीस ठाणे<br>गुन्हा क्र. १०/१९ दिनांक १४/०१/२०१९ |
| ०८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्याक्तीचीं नावे व पत्ता | अज्ञात इसम |
| ०९ | कोणत्या कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ (१) (२) अन्वये |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून, सोबत पंचनामा, उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल व अनुषंगीक कागदपत्रे पृष्ठ क्र. ०१ ते ०६ पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर केलेली आहेत.

( राजेंद्र बोरकर )
**निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर**

**स्थळ प्रतिवर प्रा. जिल्हाधिकारी यांची सही असे.**

**प्रत :** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई, 302, वेक फिल्ड हाऊस, 3रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट, मुंबई- 01 यांना माहितीस्तव सविनय सादर.